(५)

संशोधनाचा आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयाच्या पीएच.डी.
पदवी सादर केलेला संशोधन आराखडा

" वि.का. राजवाडे व त्र्यं.श. शेजवलकर यांच्या मराठ्यांच्या इतिहास लेखनाचा तौलनिक अभ्यास "

: संशोधक :

प्रा. मुळे शिवाजी ज्ञानोबा

इतिहास विभाग प्रमुख

पी.डी. यु. महाविद्यालय देवणी

ता. देवणी जि. लातूर.

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ. रामभाऊ राजाराम मुटकुळे

इतिहास विभाग प्रमुख

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत.

“वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या मराठ्यांच्या इतिहास लेखणाचा तौलनिक अभ्यास”

प्रस्तावना

भारत हा एक खंडप्राय देश आहे. या देशाला भव्य असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. आपल्याला ज्ञात असलेली आणि अभिप्रेत असलेली इतिहास संकल्पना ही पाश्चात्य आहे. खऱ्या अर्थाने १९ व्या शतकापासून भारतात इतिहास लेखणाची सुरूवात झालेली आहे. इतिहास हा काव्य, कथा, गोष्टी व कादंबऱ्या इत्यादी द्वारे येतो. पण पुराव्याद्वारे इतिहासकारामार्फत सांगितलेला इतिहास हा प्रमाण मानला जातो. आधुनिक काळात काल्पनिक इतिहासाला महत्त्व नाही. आज इतिहासाची नाळ जपणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. वि.का. राजवाडे यांनी अवघा महाराष्ट्र पायपीट करून आयुष्यभर मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा केली. त्याचबरोबर त्र्यं.शं. शेजवळकर यांनीही मराठ्यांच्या इतिहासावर तटस्थपणे विपुल लिखाण केले आहे. तसेच का.ना. साने, वा.वा. खरे, द.ब. पारनीस, न्या. म.गो.रानडे, डॉ. आर.जी. भांडारकर, चि.वी. वैद्य इत्यादी इतिहास संशोधकांची फळी निर्माण झाली. पुढे वरील संशोधकांपासून स.मा. गर्गे, म.र. फाटक, डॉ. बाळकृष्ण, डॉ. अप्पासाहेब पवार, वा.सी. बेंद्रे, डॉ. अ.रा. कुलकर्णी, डॉ.जयसिंगराव पवार यांच्यापर्यंत महाराष्ट्राला इतिहास संशोधकाची परंपरा लाभली आहे.

मराठ्यांचा इतिहास प्रथमतः प्रकाशात आणण्याचे प्रयत्न स्प्रिंगेल, वेरिंग, स्कॉग, ग्रँडफ, रॉलिन्सन, एल्फिन्स्टन, एलिएट, डारूसन इ. पाश्चात्य इतिहासकारांनी केला. परंतु या युरोपियन इतिहासकारांच्या साम्राज्यवादी दृष्टीकोनातून बाहेर पडलेला मराठ्यांचा इतिहास पूर्वग्रह दूषित स्वरूपाचा ठरतो.

पाश्चात्य शिक्षणामुळे समर्थ बनलेल्या व त्याचबरोबर राष्ट्रवादी भावनने प्रेरित झालेल्या महाराष्ट्रातील काही विद्वान मंडळींनी स्वप्रयत्नातून मराठ्यांच्या इतिहास संशोधनाचे कार्य हाती घेतले. यातून साने, किर्तने, पारसनीस, वासुदेवशास्त्री खरे, राजवाडे, शेजवळकर, रानडे, बेंद्रे कुलकर्णी इ.इतिहास संशोधकांचा वर्ग निर्माण झाला.

२० व्या शतकात वास्तववादी दृष्टीकोनातून इतिहास लिहिण्याचा प्रघात सुरू झाला. असंख्य नवनवे संसोधक मराठ्यांच्या इतिहासाकडे वळले.परंतु नाव घेण्यासारखे संशोधन व लिखाण क्वचितांकडूनच घडले. जदुनाथ सरकार, एस.पी. सेन, गो.स. सरदेसाई, दत्तो वामन पोतदार, वि.का. राजवाडे, त्र्य.श. शेजवळकर,न.र. फाटक, वा.सी. बेंद्रे, ग.ह. खरे, अ.रा. कुलकर्णी इ. संशोधकांनी मराठ्यांचा इतिहास मोठ्या प्रमाणात प्रकाशात आणला.

प्रस्तूत शोधप्रबंधात मराठ्यांच्या इतिहास लेखणाच्या संदर्भातने वि.का. राजवाडे व त्र्य.श. शेजवळकर यांच्या लेखनाचा आढावा घेण्यात येणार आहे. या दोघांनी बाजवलेली भूमिका कोणती? त्यांची संशोधनाची पद्धत काय होती?

त्यांनी कोणत्या ऐतिहासिक साधनांवर जास्त भर दिला? या दोघांच्या लिखानात नेमका काय फरक आहे. याचा तौलनिक अभ्यास या शोध प्रबंधाच्या निमित्ताने करण्याचे योजिले आहे.

१) संशोधन विषयाची निवड :-

आतापर्यंत मराठ्यांच्या इतिहासावर अनेक इतिहासकारांनी संशोधन करून इतिहास लेखन केले आहे. आणि त्या इतिहासकारांवरही अनेक संशोधकांनी संशोधनपर लेखन केले आहे. वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर हे मराठेकालीन इतिहासावर चांगले संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी मराठ्यांचा इतिहास, मराठेकालीन समाज व संस्कृती, मराठेकालीन ग्रामीण जीवन, मराठ्यांच्या इतिहासाची साधने अशा महत्त्वपूर्ण पैलूंवर संशोधनपर लेखन केले आहे. परंतु या दोघांच्या मराठ्यांच्या इतिहास लेखनाच्या मांडणीत काही फरक जाणवतात. या लेखणाचा तौलनिक अभ्यास व्हावा, या हेतूने प्रस्तूत संशोधकाने " वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या मराठ्यांच्या इतिहास लेखणाचा तौलनिक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन पद्धती :-

इतिहास संशोधनासाठी विविध संशोधन पद्धतीचा उपयोग येतो. विश्लेषणात्मक संशोधनासाठी संदर्भ पद्धतीचाच प्रामुख्याने वापर करावा लागतो. प्रस्तूत शोध प्रबंधासाठी संदर्भ पद्धतीचाच वापर करण्याचे योजिले आहे.

३) संशोधनाची उद्दिष्टये :-

प्रस्तूत शोध प्रबंधाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) मराठ्यांच्या इतिहासाविषयीचा वि.का. राजवाडे आणि त्र्यं.शं.शेजवळकर यांच्या लेखनाचा दृष्टीकोन स्पष्ट करणे.

२) मराठ्यांच्या इतिहासावर संशोधन आणि लेखन करणारे इतिहासकार म्हणून वि.का. राजवाडे आणि त्र्यं.शं.शेजवळकर यांनी कोणते नवीन निष्कर्ष काढले त्यांचा शोध घेणे.

३) मराठ्यांच्या इतिहास संशोधनासंबंधी वि.का. राजवाडे आणि त्र्यं.शं.शेजवळकर यांनी कोणती भूमिका बजावली ते मांडणे.

४) वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या संशोधनाची व लेखणाची समाजाला ओळख करून देणे.

५) वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या लेखणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) गृहितके :-

१) वि.का. राजवाडे आणि त्र्यं.शं.शेजवळकर यांनी मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाच्या संदर्भात विस्तृत लेखन केले आहे.

२) वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांनी मराठ्यांच्या इतिहासांच्या संदर्भ साधनावर सविस्तर लेखन केले आहे.

३) मराठ्यांच्या इतिहास लेखनासंदर्भात वि.का. राजवाडे व त्र्यं.शं.शेजवळकर यांची स्वतंत्र व वेगवेगळी मांडणी केलेली आहे.

४) मराठ्यांच्या इतिहास लेखणाविषयी वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या मांडणीमध्ये फरक आहे.

५) संशोधनाचा दृष्टीकोन :-

कोणत्याही इतिहासकाराने किती प्रमाणात लिहिले यापेक्षा काय लिहिले व त्यांचे निष्कर्ष काय काढले आहेत. हे महत्त्वाचे ठरते. याच दृष्टीकोनातून मी वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या लेखनाकडे पाहण्याचा प्रयत्न करणार आहे.

६) संशोधनाची व्याप्ती व कालावधी :-

प्रस्तूत शोधप्रबंध व अंशकालीन स्वरूपाचा आहे. सदरील शोध प्रबंधात वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या मराठ्यांच्या इतिहास लेखणाचा तौलनिक अभ्यास करणे ही प्रबंधाची व्याप्ती होय. संशोधक इतिहास विषयाचे सहाय्यक प्राध्यापक आहेत. त्यामुळे हा अभ्यास तीन वर्षात पूर्ण करण्यात येईल.

७) विषयाचे महत्त्व :-

भारताच्या इतिहासामध्ये मराठ्यांचा इतिहास हा सुवर्णअक्षरांनी लिहिला जावा असा इतिहास आहे. आजतागायत मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे अनेक संशोधने झाली आहेत. या संशोधन करणाऱ्या संशोधकावर व इतिहासकारावर देखील संशोधने झाली आहेत. पण मराठ्यांच्या इतिहास लेखणासंदर्भाने वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या लेखनाचा तुलनात्मक अभ्यास झाल्याचे माझ्या पाहण्यात आलेले नाही. म्हणून राजवाडे व शेजवळकर यांच्या मराठ्यांच्या इतिहासाचा तौलनिक अभ्यास करून तो समाजासमोर आणल्यास त्याचा नवसंशोधकांना उपयोग होईल आणि ज्ञानात भर पडण्यास मदत होईल. म्हणून प्रस्तूत विषय निवडण्यात आला.

८) संदर्भ साधने :-

"वि.का. राजवाडे व त्र्यं.शं. शेजवळकर यांच्या मराठ्यांच्या इतिहास लेखणाचा तौलनिक अभ्यास" या संशोधन विषयासाठी प्राथमिक साधने उपलब्ध आहेत. लिखाणाकरिता एखाद्या प्रसंगी जर प्राथमिक साधणे जर मिळाले नाही किंवा एखाद्या प्रसंगी आवश्यक असलेल्या माहितीसाठी प्राथमिक साधने अपुरी पडली तरच दुय्यम साधनांचा आधार घेतला जाईल. १) भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे. २) वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ३) डॉ. बा. आ. म. वि. ग्रंथालय, औरंगाबाद ४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ग्रंथालय पुणे. ५) स्वा.रा.ती.म. वि. ग्रंथालय नांदेड. ६) भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक कार्यालय मुंबई येथून सर्व ग्रंथाची व शोध निबंधनाची प्राप्ती होईल. वेळप्रसंगी त्यांच्या संशोधनाच्या संबंधातील इतर ग्रंथाचाही आधार घेतला जाईल.

९) प्रकरणांचा आराखडा :- प्रस्तुत संशोधन हे पाच प्रकरणात विभागलेले असून ते पुढीलप्रमाणे असतील.

I) प्रस्तावना

II) वि.का. राजवाडे यांचे मराठ्यांच्या इतिहासासंबंधीचे लेखन

III) त्र्यंबक शं. शेजवळकर यांचे मराठ्यांच्या इतिहासासंबंधीचे लेखन

IV) वि.का. राजवाडे आणि त्र्यं.शं.शेजवळकर यांच्या मराठ्यांच्या इतिहास लेखनाचा तौलनिक अभ्यास

V) समारोप आणि निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची :

१) वि.का. राजवाडे : मराठ्यांच्या इतिहासाचीसाधने : एकूण २२ खंड मरणोत्तर ०४ खंड असे एकूण २६ खंड.

२) राजवाडे संपादित ग्रंथ : राधा माधव विलासचंपू - कवी जयराम पिंडे, राजवाडेंची प्रस्तावना २०१ पाने, पुणे १९२२.

३) राजवाडे संपादित ग्रंथ : महिकावतीची बखर, कर्ते केशवाचार्य आणि इतर, प्रस्तावना पु. ११० पाने २२५ (१९२४) पुणे (संपादन)

४) राजवाडे संपादित ग्रंथ : राजवाडे लेखसंग्रह, [illegible] प्रस्तावना पु. [illegible] पुणे [illegible]

५) राजवाडे संपादित ग्रंथ : राजवाडे लेखसंग्रह - खंड ०१, संकीर्ण निबंध संख्या २५, पृ. २९०, पुणे,१९३२

६) राजवाडे संपादित ग्रंथ : राजवाडे लेखसंग्रह- भाग ०३, संकीर्ण निबंध, संख्या ३२, पृ. २९०, पुणे १९३५.

७) राजवाडे संपादित ग्रंथ : भारतीय विवाह संस्थाचा इतिहास, प्रस्तावना, श्रीपाद अमृत डांगे पुणे, १९७६.

८) त्र्यं.शं. शेजवळकर : श्री शिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने मराठा मंदीर, मुंबई १९६४.

९) त्र्यं.शं. शेजवळकर : गो.स. सरदेसाई यांच्या 'नानासाहेब पेशव्यांचे चरित्र' या ग्रंथास प्रस्तावना

१०) त्र्यं.शं. शेजवळकर : 'निझाम- पेशवे संबंध' (१९५४), पुणे विद्यापीठ पुणे.

११) त्र्यं.शं. शेजवळकर : 'पानिपत १७६१' डेक्कन कॉलेज, पुणे १९४६

१२) संपादन : 'नागपूर अफेअर्स' दोन खंड संपादित.

संशोधक
प्रा. मुळे शिवाजी ज्ञानोबा
इतिहास विभाग प्रमुख
पी.डी. यु. महाविद्यालय देवणी
ता. देवणी जि. लातूर.

मार्गदर्शक
प्रा. रामभाऊ मुटकुळे
इतिहास विभाग प्रमुख
Dr. R.R. Mutkule
Research Guide
बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमत, जि. हिंगोली

❖ ❖ ❖